www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**B**

# Paper-II
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

   (Name) ..................................................

2. (Signature) ..........................................

   (Name) ..................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..................................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## APR - 01217

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **12** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.

   (A) (B) ● (D)

5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 50 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   - (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.

   (A) (B) ● (D)

5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गाचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

www.prepp.in

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



# Marathi
## Paper II
# मराठी
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This paper contains **50** multiple choice questions, each carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण **50** बहुपर्यायी प्रश्न दिलेले असून प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. 'बदलत्या काळाप्रमाणे शास्त्रालाही चालन राहिले पाहिजे' हे मत कोणी मांडले ?

(A) लोकहितवादी

(B) विष्णुशास्त्री पंडित

(C) गोपाळ गणेश आगरकर

(D) न्यायमूर्ती रानडे

2. ह.ना. आपटे यांच्या कोणत्या कादंबरीत इंग्रजी चालीरीतींचे मध्यमवर्गीयांवर झालेल्या परिणामांचे चित्रण आले आहे ?

(A) 'मी'

(B) 'मधली स्थिती'

(C) 'सूर्योदय'

(D) 'पण लक्षात कोण घेतो ?'

3. 'बळी' या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा कोणती ?

(A) तात्या

(B) आबा

(C) बापू

(D) नाना

4. मराठीतील निवडक कादंबऱ्यांचा परामर्श घेणारा नरहर कुरुंदकरांचा ग्रंथ कोणता ?

(A) रूपवेध

(B) भजन

(C) धार आणि काठ

(D) शिवरात्र

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



5. कोणत्या वाङ्मयप्रकारातील ग्रंथांचे अनुवाद मराठीमध्ये सर्वाधिक झालेले आहेत ?

(A) कथा

(B) कादंबरी

(C) कविता

(D) आत्मचरित्र

6. मराठीमध्ये सर्वात जास्त प्रती कोणत्या अनुवादित ग्रंथाच्या निघाल्या ?

(A) गीताई — विनोबा भावे

(B) गीतांजली — रवींद्रनाथ ठाकूर

(C) तृणपर्णे — सदानंद रेगे

(D) पँट घातलेला ढग — ब्लादिमीर मायकोव्हस्की

7. पुढीलपैकी कोणता अनुवाद विंदा करंदीकर यांनी केलेला **नाही** ?

(A) ॲरिस्टॉटलचे काव्यशास्त्र

(B) फाउस्ट : भाग पहिला — गटे

(C) राजा लिअर — शेक्सपिअर

(D) वन हंड्रेड इअर्स ऑफ सॉलिट्यूड — गॅब्रियल गार्सिया मार्क्वेझ

8. मराठीमध्ये सर्वात जास्त अनुवादित झालेला कादंबरीकार कोणता ?

(A) जेम्स हॅडली चेस

(B) सिडने शेल्डन

(C) ॲगाथा ख्रिस्ती

(D) इयान फ्लेमिंग

9. अनुवादित कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा आणि त्यांचे मूळ लेखक यांच्या योग्य जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (1) हर्क्युल पायरो | (5) इयान फ्लेमिंग |
| (2) जेम्स बाँड | (6) अर्ल स्टेन्ले गार्डनर |
| (3) पेरी मॅसन | (7) जे. के. रोलिंग |
| (4) हॅरी पॉटर | (8) ॲगाथा ख्रिस्ती |
| | (9) सिडने शेल्डन |

**पर्याय** :—

(A) (1)—(7), (2)—(6), (3)—(5), (4)—(8)

(B) (1)—(8), (2)—(5), (3)—(6), (4)—(7)

(C) (1)—(9), (2)—(7), (3)—(8), (4)—(6)

(D) (1)—(6), (2)—(8), (3)—(9), (4)—(5)

10. काव्यलक्षणासंबंधी संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी केलेल्या विवादाचे कारण कोणते होते ?

(A) काव्यलक्षणाची शास्त्रशुद्ध उपपत्ती मांडण्याचा आटापिटा

(B) स्वतःच्या बुद्धिवैभवाचा गर्व

(C) दुसऱ्या साहित्यशास्त्रकाराविषयीचा मत्सर

(D) वादविवादाची हौस

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



11. मम्मटाने सांगितलेल्या काव्यप्रयोजनांपैकी संपूर्णत: कालबाह्य झालेले काव्यप्रयोजन कोणते ?

(A) यश:प्राप्ती

(B) अर्थप्राप्ती

(C) शिवेतरक्षति

(D) व्यवहारविद्

12. प्रतिभाशक्तीचे कोणते दोन प्रकार अभिनवगुप्ताने मानलेले आहेत ?

(A) चल प्रतिभा व अचल प्रतिभा

(B) कारयित्री प्रतिभा व भावयित्री प्रतिभा

(C) नवनिर्माणक्षमा प्रतिभा व पुनर्निर्मितिक्षमता प्रतिभा

(D) कलाधिष्ठित प्रतिभा व शास्त्राधिष्ठित प्रतिभा

13. 'अपूर्ववस्तूनिर्माणक्षमा प्रज्ञा प्रतिभा' या वचनातील 'वस्तु' या शब्दाचा अर्थ काय ?

(A) पदार्थ

(B) नवनिर्मिती

(C) व्यक्तिरेखा

(D) काव्याचे आशयसूत्र

14. श्रीशंकुकाच्या उपपत्तीनुसार रसाभिव्यक्तीचा मुख्य घटक कोणता ?

(A) अनुकरण

(B) साधारणीकरण

(C) स्थायीभाव जागृती

(D) कल्पना

15. पोट बिघडलेले असते तेव्हा कविता वाचण्याकडे लक्ष लागत नाही, यामध्ये कोणते रसविघ्न आढळून येते ?

(A) विभाववैकल्य

(B) प्रतीतिवैकल्य

(C) निजसुखा दिविवशीभाव

(D) पूर्वग्रहनिर्धारण

16. 'साहित्यकृती ही स्वायत्त व स्वयंपूर्ण वस्तू आहे' ही भूमिका कोणत्या समीक्षापद्धतीस आधारभूत आहे ?

(A) जीवनवादी

(B) रूपवादी

(C) अस्तित्ववादी

(D) आदिबंधात्मक

www.prepp.in



17. 'द आर्किटाइप्स ऑफ लिटरेचर' या ग्रंथाचे लेखक कोण आहेत ?

(A) मॉड बॉडकिन

(B) जेम्स फ्रेझर

(C) नॉर्थोप फ्राय

(D) सी.जी. युंग

18. मराठीमध्ये 'कथनमीमांसा' हा दीर्घ लेख कोणी लिहिला आहे ?

(A) म.सु. पाटील

(B) गंगाधर पाटील

(C) मिलींद मालशे

(D) वसंत पाटणकर

19. 'पोत' ही संकल्पना कोणी मांडली आहे ?

(A) द.ग. गोडसे

(B) बा.सी. मर्ढेकर

(C) दि.के. बेडेकर

(D) माधव आचवल

20. 'वाङ्मयीन महात्मता' ही संकल्पना कोणी मांडली आहे ?

(A) मे.पुं. रेगे

(B) रा.भा. पाटणकर

(C) बा.सी. मर्ढेकर

(D) प्रभाकर पाध्ये

21. 'जीवनानुभव, हे एखाद्या तुरुंगातील अनुभवांसारखे असतात' असा दृष्टान्त पुढीलपैकी कोणी दिला आहे ?

(A) सिग्मंड फ्रॉइड

(B) युंग

(C) फुको

(D) बाख्तिन

22. पुढील शब्दांपैकी कोणता शब्द प्रथमपुरुषवाचक सर्वनाम आहे ?

(A) तो

(B) आम्ही

(C) ते

(D) त्या

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



23. नामास लागणाऱ्या चरमप्रत्ययांच्या वर्गास विभक्ती असे म्हणतात, तर धातूस लागणाऱ्या चरमप्रत्ययांच्या वर्गास आख्यात असे म्हटले जाते.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

24. आख्यातार्थ व्यक्त करण्याचे कार्य जसे प्रत्यय करतात, तसे कार्य संयुक्त क्रियापदासारखे शब्दही करतात.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

25. संयुक्त क्रियापदे हा मराठीतील एक विवाद्य प्रश्न असून ती इंग्रजीच्या द्वारा लॅटिनमधून आली आहेत.

(A) संपूर्ण विधान चूक

(B) संपूर्ण विधान बरोबर

(C) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

(D) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

26. क्रियापदाला संस्कृतमध्ये काय म्हणतात ?

(A) आख्यात

(B) विभक्ती

(C) कृदंत

(D) धातू

27. जाहिरात ही कला कोणत्या प्रकारची मानली जाते ?

(A) दृक्-श्राव्य

(B) विशुद्ध

(C) उपयोजित

(D) प्रयोगजीवी

28. जाहिरातीच्या मथळ्याचे प्रमुख वैशिष्ट्य कोणते आहे ?

(A) आनंदजनक

(B) कुतूहलजनक

(C) रोमांचकारक

(D) माहितीपर

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



29. उत्पादित वस्तूच्या जाहिरातीमध्ये पुढीलपैकी कोणता घटक आवश्यक असतो ?

(A) बोधचिन्ह

(B) काव्य

(C) संगीत

(D) संवाद

30. पत्रलेखनातील 'प्रति' या शब्दाने कशाचा बोध होतो ?

(A) ज्याने पत्र पाठवले आहे त्याचा

(B) ज्याला पत्र पाठवायचे आहे त्याचा

(C) पाठवणाऱ्याचा पत्ता

(D) ज्याठिकाणी पत्र पाठवायचे तेथील पत्ता

31. ग्रिअर्सनच्या भारतीय भाषांच्या सर्वेक्षणाच्या कोणत्या खंडात मराठीच्या बोलींसंबंधी माहिती ग्रथित केली आहे ?

(A) तिसऱ्या

(B) पाचव्या

(C) सहाव्या

(D) सातव्या

32. ऐतिहासिकता, प्रामाण्य, जिवंतपणा व स्वायत्तता ही कोणत्या भाषेची सारतत्त्वे आहेत ?

(A) संगणकीय भाषा

(B) बोली भाषा

(C) प्रमाण भाषा

(D) एस.एम.एस.ची भाषा

33. पुढीलपैकी भाषेचे सर्वात महत्त्वाचे रूप कोणते ?

(A) वाचणे

(B) ऐकणे

(C) बोलणे

(D) लिहिणे

34. 'महाप्राण मराठीत अर्थनिर्णायक आहे, इंग्रजीत नाही.'

(A) हे विधान बरोबर आहे

(B) हे विधान चूक आहे

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

www.prepp.in



35. फलाहार > फराळ, हे स्वनपरिवर्तन पुढीलपैकी कोणत्या प्रक्रियेचे उदाहरण आहे ?

(A) सदृशीकरण

(B) विसदृशीकरण

(C) स्वनव्यत्यास

(D) सदृशस्वनलोप

36. मराठी भाषेच्या निर्मितीचा विचार करताना 'क्रिओलाईझ्ड प्राकृत' असा मराठीचा निर्देश कोणी केला आहे ?

(A) साउथवर्थ

(B) अ. म. घाटगे

(C) चिं. वि. वैद्य

(D) व्हेर्नर

37. संयुक्त क्रियापदे अपभ्रंशात नाहीत, मराठीने ती स्वतंत्रपणे बनवलेली आहेत.

(A) हे विधान बरोबर आहे

(B) हे विधान चूक आहे

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) उत्तरार्ध बरोबर, पूर्वार्ध चूक

38. 'संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमध्ये खोलवर रुजलेले व घनिष्ठ साम्य आहे' असे म्हणून त्याचा खुलासा सर विल्यम जोन्स यांनी कोणत्या वर्षी केला ?

(A) 1786

(B) 1876

(C) 1768

(D) 1678

39. पुढीलपैकी कोणत्या एका चिन्हाने दिग्दर्शित होणारी ध्वनी मराठी भाषेत वापरत नाहीत ?

(A) ऋ

(B) लृ

(C) ञ

(D) ङ्

40. पुढील शब्दांमधला कोणता शब्द लेखननियमांनुसार **अचूक** आहे ?

(A) आशीर्वाद

(B) आशिर्वाद

(C) आर्शिवाद

(D) आर्शीवाद

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



41. पुढील शब्दांपैकी कोणता शब्द लेखननियमांनुसार **अचूक** आहे ?

(A) पुनर्निर्मिती

(B) पुर्नर्निमिती

(C) पुनर्निमिति

(D) पुननिर्मिर्ती

42. पुढील शब्दांपैकी कोणता शब्द लेखननियमांनुसार **अचूक** आहे ?

(A) नि:सर्गतच

(B) निसर्गताच

(C) निसर्गत:च

(D) निर्सगत:च

43. पंढरपूर येथील विठ्ठल मंदिराची स्थापना शके 1111 मध्ये झाली, असा पुरावा देणारा शिलालेख कोणता ?

(A) चौऱ्यांएंशीचा शिलालेख

(B) पंढरपूरचा शिलालेख

(C) पळसदेव शिलालेख

(D) मंगळवेढ्याचा शिलालेख

44. 'महदंबेचे 'मातृकी रुक्मिणी स्वयंवर' हे दीर्घकाव्य 'धवळ्या'च्या तुलनेत काव्यदृष्ट्या अधिक सरस असले तरी या कथाकाव्याची भक्तिरसाची बैठक मात्र डळमळीत आहे.'

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

45. भास्करभट्ट बोरीकरांच्या 'शिशुपाळवध' या काव्याविषयी 'ग्रंथु निका झाला/परि निवृत्ताजोगा नव्हेचि:' असा अभिप्राय कोणी व्यक्त केला ?

(A) नागदेवाचार्य

(B) चक्रधरस्वामी

(C) कवीश्वर बांस

(D) बाईदेवी बांस

46. भागवतधमाचे प्रथम संघटक व प्रचारक कोण ?

(A) ज्ञानेश्वर

(B) नामदेव

(C) निवृत्तिनाथ

(D) चांगदेव

www.prepp.in



47. 'भिंगाचे भिंगुले खांद्यावर अंगुले।

नाचत तान्हुले यशादेचे॥'

ही रचना कोणत्या संत कवीची आहे ?

(A) संत नामदेव

(B) संत तुकाराम

(C) संत एकनाथ

(D) संत मुक्ताबाई

48. 'माझी मराठी भाषा चोखडी। परब्रह्मे फळली मोठी' असा मराठी भाषेचा गौरव कोणी केला ?

(A) ज्ञानेश्वर

(B) एकनाथ

(C) तुकाराम

(D) रामदास

49. 'पुण्य परउपकार पाप ते परपीडा। आणीक नाही जोडा दुजा यासी' ही रचना कोणत्या संताची आहे ?

(A) संत नामदेव

(B) संत एकनाथ

(C) संत जनाबाई

(D) संत तुकाराम

50. 'तरुणी-शिक्षण नाटिका' या नाटकातून ना. बा. कानिटकर यांनी स्त्रीशिक्षण व स्त्रीस्वातंत्र्य याविषयी 19व्या शतकातील रूढीप्रिय परंपरावादी वृत्तीच्या मध्यमवर्गीयांची प्रातिनिधिक विचारसरणी मांडली आहे. केसरीचे तत्कालीन संपादक बाळ गंगाधर टिळक याच विचारांचे पुरस्कर्ते होते.

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

www.prepp.in



## ROUGH WORK

Your Personal Exam Guide